करोना साथीच्या गणितीय प्रारूपांबाबत पूर्वग्रह!

नवी दिल्ली : भारतातील कोविड-१९ महासाथीच्या तीव्रतेबाबतच्या गणितीय प्रारूपांमध्ये, करोना संसर्गाची व मृत्यूंची प्रकरणे याबाबतचे भाकीत करण्याबद्दल मोठा पूर्वग्रह होता आणि ते वस्तुस्थितीपेक्षा फार वेगळे असल्याचे सिद्ध झाले, असे भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या आणि इंडियन जर्नल ऑफ मेडिकल रिसर्चमध्ये प्रकाशित झालेल्या संपादकीयात म्हटले आहे.

पूर्वनियोजन करण्यासाठी धोरणविषयक निर्णय घेण्याकरता या प्रारूपांवर संपूर्णपणे अवलंबून राहण्यात 'प्रचंड धोका' आहे, कारण एखाद्या नव्या विषाणूपासून उद्भवणाऱ्या संसर्गजन्य रोगांबाबत भाकीत करणे अत्यंत धोकादायक आहे व त्यामुळे ते टाळले जायला हवे, असे यात नमूद केले आहे.

'कोविड-१९ महासाथीच्या भारतातील पहिल्या १०० दिवसांत शिकलेले धडे' या शीर्षकाचे हे संपादकीय जागतिक आरोग्य संघटनेच्या आग्नेय आशिया क्षेत्रीय कार्यालयातील संसर्गजन्य रोगांचे माजी संचालक राजेश भाटिया आणि आयसीएमआरच्या राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेच्या संचालक प्रिया अब्राहम यांनी लिहिले आहे.

अनेक गणितीय प्रारूपांनी करोना संसर्गाच्या आणि करोनामृत्यूच्या प्रकरणांच्या दृष्टिकोनातून या महासाथीच्या तीव्रतेचे भाकीत केले होते आणि किमान भारताच्या संदर्भात यापैकी एकही भाकीत खरे ठरले नाही; तसेच संसर्गजन्य रोगांबाबतच्या जैविक घटनांबाबत भाकीत करण्यात ते अपयशी ठरले, असे यात नमूद केले आहे.

करोनाच्या काळात प्रस्तावित प्रारूपांमध्ये पूर्वग्रहाचा मोठा घटक होता आणि यात वस्तुस्थितीपासून फार दूर असलेल्या गृहितकांचा वापर करण्यात आला, ही बाब या संपादकीयात अधोरेखित करण्यात आली आहे.

चिनी कंपनीला दिलेले रेल्वेच्या कामाचे कंत्राट रद्द

नवी दिल्ली : मालवाहतुकीसाठी पूर्व भारतात बांधल्या जाणाऱ्या रेल्वेमार्गावरील ४१७ किलोमीटरच्या खंडावर सिग्नलिंग व दूरसंचार यंत्रणेच्या कामाची प्रगती संथ असल्यामुळे, एका चिनी कंपनीला देण्यात आलेले या कामाचे कंत्राट रद्द करण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे.

'ईस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर'च्या कानपूर ते मुगलसराय ४१७ किलोमीटर खंडाच्या बांधकामासाठी ४७१ कोटी रुपयांचे कंत्राट रेल्वेने बीजिंग नॅशनल रेल्वे रीसर्च अँड डिझाईन इन्स्टिट्यूट ऑफ सिग्नल अँड कम्युनिकेशन ग्रुपला २०१६ साली दिले आहे. हे काम २०१९ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते; मात्र आतापर्यंत २० टक्केच काम पूर्ण झाले आहे, असे रेल्वेने सांगितले.

पुरी यात्रेला न्यायालयाची स्थगिती

नवी दिल्ली : करोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने २३ जूनपासून सुरू होणाऱ्या ऐतिहासिक पुरी रथयात्रेला आणि अन्य संबंधित कार्यक्रमांना स्थगिती दिली आहे. सार्वजनिक आरोग्य आणि नागरिकांची सुविधा यांचे हित लक्षात घेऊन यंदाच्या पुरी रथयात्रेला परवानगी देता येऊ शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

स्थलांतरित मजुरांना आधार

देशातील ११६ जिल्ह्यांत चार महिन्यांची रोजगार हमी; उद्या योजनेचे उद्घाटन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : करोनामुळे गावी परतलेल्या लाखो मजुरांना रोजगार देण्यासाठी केंद्र सरकार ५० हजार कोटींची गरीब कल्याण रोजगार योजना राबवणार आहे.

या योजनेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या, शनिवारी २० जून रोजी बिहारमधील खगडिया गावातून होणार आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. या योजनेसाठी दिला जाणारा निधी अर्थसंकल्पीय तरतूद असून ग्रामीण भागांमध्ये मालमत्तानिर्मिती करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. जे मजूर गावी परत गेले त्यांना तातडीने रोजगार मिळावा या उद्देशाने ही योजना आखण्यात आली आहे. खासगी कंपन्या सुरू होत आहेत, त्यांच्या एजंटांच्या माध्यमातून मजुरांना कामावर परत लावले जात आहे. त्यामुळे किती मजूर परत जातात हे पाहून या योजनेचा आढावा घेतला जाईल, असे सीतारामन म्हणाल्या. पंजाबमध्ये खासगी कंपन्या रेल्वेचे तिकीट देऊन मजुरांना परत बोलावले जात आहे, असे कामगार कल्याणमंत्री संतोष गंगवार म्हणाले.

पुण्यात दोन हजार नवे रोजगार

'ब्रिटिश पेट्रोलियम'ने पुण्यात जागतिक व्यापार सेवा केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला असून २०२१ मध्ये हे केंद्र कार्यरत होईल. या केंद्रात किमान २ हजार रोजगार निर्माण होतील, अशी माहिती केंद्रीय पेट्रोलियममंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिली. ब्रिटिश पेट्रोलियमच्या जगभरातील उद्योग घडामोडींना माहिती-तंत्रज्ञानावर आधारित पाठबळ या सेवाकेंद्रातून मिळणे अपेक्षित आहे.

'दशकांच्या टाळेबंदीतून कोळशाच्या खाणी मुक्त'

देशातील ४१ कोळसा खाणींच्या ई-लिलावाची प्रक्रिया सुरू झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवारी औपचारिक कार्यक्रम पार पडला. दशकांच्या टाळेबंदीतून कोळशाच्या खाणी मुक्त होत असून आता भारताने जगातील कोळशाचा सर्वात मोठा निर्यातदार होण्याकडे वाटचाल केली पाहिजे, असे मोदी म्हणाले. केंद्र सरकारने कोळसा खाणी खासगी क्षेत्रासाठी खुले केले असून ई-लिलावाच्या माध्यमातून व्यापारी तत्त्वावर उत्खननासाठी खासगी कंपन्यांना दिल्या जाणार आहेत.

होणार काय?

- बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, ओडिशा, झारखंड अशा ६ राज्यांतील ११६ जिल्ह्यांमधील सुमारे २९ लाख मजुरांना पुढील ४ महिने (१२५ दिवस) रोजगाराची हमी देणारी योजना राबवली जाणार आहे.
- या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी किमान २५ हजार मजूर गावी परतल्याचे केंद्राला आढळले आहे.
- कौशल्यांची नोंद करण्यात आली असून केंद्र सरकारच्या २५ योजना एकत्रितपणे प्रत्येक जिल्ह्यामध्ये राबवल्या जातील.

'यूएनएससी'मध्ये भारताचा विजय

पीटीआय, संयुक्त राष्ट्रे

संयुक्त राष्ट्रे सुरक्षा परिषदेवर (यूएनएससी) भारताची दोन वर्षांसाठी अस्थायी सदस्य म्हणून भरघोस मतांनी निवड करण्यात आली. करोनामुळे सामाजिक अंतराचा नियम पाळून आणि मुखपट्ट्या लावून १९२ देशांच्या राजदूतांनी निवडणुकीसाठी मतदान केले. आशिया-पॅसिफिक उमेदवार असलेल्या भारताला १९२ पैकी १८४ मते मिळाली.

भारताची यूएनएससीमध्ये प्रथम १९५० मध्ये निवड झाली होती. त्यानंतर सात वेळा भारत अस्थायी सदस्य म्हणून निवडला गेला आहे. यापूर्वी २०११-१२ मध्ये भारताची निवड झाली होती.

मोदींकडून आभार व्यक्त

संयुक्त राष्ट्रे सुरक्षा परिषदेत भारताला सदस्यत्व मिळण्यासाठी जागतिक समुदायाने जो भरघोस पाठिंबा दिला, त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी सर्व संबंधितांचे आभार मानले आहेत. जागतिक शांतता, सुरक्षा, समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सर्व सदस्यांसमवेत काम करील, असेही मोदी यांनी म्हटले आहे. भारताला दोन वर्षांसाठी सदस्यत्व मिळाले असून त्याची मुदत १ जानेवारी २०२१ रोजी सुरू होणार आहे.

अस्थायी सदस्यत्वाचा उपयोग दहशतवादाविरुद्ध

दहशतवादी संघटनांकडून संपर्क तंत्रज्ञानाचा आणि माहितीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत असून त्यावर परिणामकारक कृती करण्याचे आणि दहशतवादाला होणारे आर्थिक साहाय्य थांबविण्याचा प्रयत्न करण्याचे भारताने ठरविले आहे, असे संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या राजदूतांनी म्हटले आहे. कोणत्याही स्वरूपातील दहशतवादाला कोणत्याही स्थितीत थारा नाही ही भारताची ठाम भूमिका आहे, असे संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे कायमस्वरूपी प्रतिनिधी टी. एस. तिरुमूर्ती यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीमध्ये म्हटले आहे.

नकाशाबाबत घटनादुरुस्ती विधेयक नेपाळी संसदेत मंजूर

काठमांडू : भारताच्या हद्दीतील लिपुलेख, कालापानी व लिंपियाधुरा हे महत्त्वाचे भाग समाविष्ट केलेल्या नव्या राजकीय नकाशाला मान्यता देण्यासाठीचे घटनादुरुस्ती विधेयक नेपाळच्या संसदेने गुरुवारी एकमताने मंजूर केले. अशा प्रकारे एखादा प्रदेश कृत्रिमरीत्या समाविष्ट करता येत नाही, अशा शब्दांत भारताने निषेध नोंदवला असतानाही नेपाळने ही कृती केली.

नव्या राजकीय नकाशाला नेपाळी संसदेच्या कनिष्ठ सभागृहाने शनिवारी एकमताने मंजुरी दिली होती. सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या भागांवर दावा सांगणारा सुधारित राजकीय व प्रशासकीय नकाशा नेपाळने १८ मे रोजी जारी केला होता. देशाच्या नव्या राजकीय नकाशाचा राष्ट्रीय प्रतीकचिन्हात समावेश करण्याची तरतूद असलेले घटनादुरुस्ती विधेयक 'नॅशनल असेम्बली' या नेपाळी संसदेच्या वरिष्ठ सभागृहाने गुरुवारी मंजूर केले. हे विधेयक राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठवले जाणार आहे.

महाराष्ट्र शासन

वस्तू व सेवा कर विभाग

ई-निविदा सूचना

वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मुंबई क्षेत्रामधील असलेल्या कार्यालयाकरिता ५९-कंत्राटी वाहनचालकांच्या सेवा कार्यादेशाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी बाह्य तत्त्वावर घेण्यासाठी सक्षम, अनुभवी व नामांकित सेवा पुरवठादारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा दिनांक १६.०७.२०२० पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत रु. २०,०००/- (अक्षरी- रु. वीस हजार फक्त) भरून https://maharashtra.etenders.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल.

सदर ई-निविदा, राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क), ई-विंग, पहिला मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवा कर भवन, माझगाव, मुंबई-१० यांच्या कार्यालयात दि. २४.०७.२०२० ते दि. २७.०७.२०२० दरम्यान उघडण्यात येतील.

कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

सही/-
अभिजीत घवले
राज्यकर उपआयुक्त, (जनसंपर्क),
मुंबई

डीजीआयपीआर २०२०-२०२१/२१४

pnb Housing Finance Limited
Ghar Ki Baat

नोंदणीकृत कार्यालय : ९ वा मजला, अंतरिक्ष भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली-११०००१
फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

मुंबई कार्यालय : १०१ पहिला मजला, ''प्लॅटिना'', प्लॉट नं. सी-५९, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-४०००५१, वेबसाइट : www.pnbhousing.com

परिशिष्ट-IV-ए

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता जाहीर सूचना-ई-लिलाव-नि-विक्री

सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ नियम ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या वित्तीय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना

ही सूचना तालिकेतील रकाना क्र. डी अंतर्गत नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेच्या (''स्थावर मालमत्ता'')च्या विक्रीकरिता रकाना क्र. ए मध्ये दर्शविल्यानुसार आणि जसे असेल त्यानुसार, विशेषकरून संबंधित ऋणको / हमीदारांचे विधि वारसदार (जे ज्ञात किंवा अज्ञात आहेत), कार्यकारी, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना तसेच आम जनतेस याद्वारा देण्यात आली आहे.

असे की सुरक्षित धनको, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (''पीएनबीएचएफएल/ सुरक्षित धनको'') ही वेळोवेळी सुधारित केल्यानुसार कंपन्या अधिनियम, १९५६/२०१३ अंतर्गत नोंदणीकृत हाऊसिंग फायनान्स कंपनी आहे, तसेच नॅशनल हाऊसिंग बँक ॲक्ट, १९८७ च्या कलम २९-ए अंतर्गत नॅशनल हाऊसिंग बँककडे नोंदणीकृतसुद्धा आहे. ऋणकोंनी ''पीएनबीएचएफएल''कडून पत सुविधेचा (रकाना क्र. ए) लाभ घेतला होता, ज्याकरिता परतावा दर्शविणाऱ्या लोन अकाऊंटमध्ये नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून ऋणकोद्वारा कसूर दाखविण्यात आली आहे.

ज्याअर्थी, कायद्याअंतर्गत ''पीएनबीएचएफएल''चे प्राधिकृत अधिकारी असलेले आणि नियम ३ यासह वाचलेल्या कलम १३ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून / सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत त्यामध्ये नमूद केल्यानुसार रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणकोंवर फर्माविणारी २६ फेब्रुवारी २०२० रोजी मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात आली होती की, निम्नस्वाक्षरीकारांनी उक्त नियमांच्या नियम ८ यासह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत ११ जून २०२० रोजी स्थावर मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

आता, याखाली नमूद केलेल्या तालिकेच्या रकाना क्र. 'बी'अंतर्गत नमूद केलेल्या सुरक्षित ऋणांच्या वसुलीकरिता याखाली दिलेल्या तपशिलानुसार ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता ई-जाहीर लिलावाकरिता निम्नस्वाक्षरीकाराद्वारा प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. या मालमत्तेचा ताबा ''पीएनबीएचएफएल''कडून ऋणकोंकडून घेतलेल्या पत सुविधेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घेण्यात आला आहे. सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(५) च्या अनुसार आणि सुरक्षित धनको (पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांच्या सल्ल्यानुसार स्थावर मालमत्तेकरिता राखीव किंमत अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या रमकेपेक्षा कमी नसलेली निश्चित करण्यात आली आहे. त्याचबरोबर राखीव किमतीच्या अनुसार इसारा रक्कम ठेव (इरठे) अनुसूचित नमूद केल्यानुसार निश्चित करण्यात आली आहे.

ही ३० दिवसीय सूचना सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या अनुपालनार्थ तुम्हास, ''ऋणको'' देण्यात येत आहे आणि तुम्हास याद्वारा कळविण्यात आणि अधिसूचित करण्यात येते की, मालमत्तेची विक्री प्रत्येकी ५ मिनिटांच्या विस्तारासह २४ जुलै, २०२० रोजी स. ११.०० पासून ते सायं. ०५.०० वा.पर्यंत ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर ''ई-लिलाव पद्धतीत जाहीर लिलावामार्फत'' नियमांच्या नियम ८(५) अंतर्गत ही सूचना दिल्याच्या तारखेपासून पूर्ण ३० दिवसांच्या समाप्तीनंतर करण्यात येणार आहे.

लोन नं. / ऋणको / सह-ऋणको / हमीदार / विधि वारसदारांची नावे (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचा प्रकार (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	पाहणीची तारीख व वेळ (एच)	लिलावाची तारीख व वेळ (आय)	ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (जे)
डब्लूएफएच / सीसीएफ / ०९१७ / ४२७९३१ आणि डब्लूएफएच / सीसीएफ / ०९१७ / ४२७९४१ १. ऐश्वर्या अवंत बिल्डर्स एलएलपी तिचे नोंदणीकृत कार्यालय : ५२२, ५वा मजला, दि सुमित-बिझिनेस बे, अंधेरी (पू.), डब्लूईएच मेट्रो गेट ३, गुरू नानक पेट्रोल पंप, मुंबई-४०००६९, महाराष्ट्र. ईमेल : sudeep.saha@avantinfra.com २. अवंत व्हेंचर्स एलएलपी तिचे नोंदणीकृत कार्यालय : ५२२, ५वा मजला, दि सुमित-बिझिनेस बे, अंधेरी (पू), डब्लूईएच मेट्रो गेट ३, गुरू नानक पेट्रोल पंप, मुंबई-४०००६९, महाराष्ट्र. ईमेल : accounts@avantinfra.com ३. अवंत इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड तिचे नोंदणीकृत कार्यालय : ५२२, ५वा मजला, दि सुमित-बिझिनेस बे, अंधेरी (पू), डब्लूईएच मेट्रो गेट ३, गुरू नानक पेट्रोल पंप, मुंबई-४०००६९, महाराष्ट्र. ईमेल : accounts@avantinfra.com ४. श्री. सुदीपकुमार साहा, श्री. भोलानाथ साहा यांचे सुपुत्र राहणार : २०३, ''बी'' विंग, ऑबेरॉय स्प्लेंडर, जोगेश्वरी-विक्रोळी रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई-४०००६०. ईमेल : sudeep.saha@avantinfra.com ५. श्री. हरीश रजनीकांत साहा, श्री. रजनीकांत रतिलाल साहा यांचे सुपुत्र राहणार : ३४, ''बी'' सोफिया बिल्डिंग, सोफिया कॉलेज लेन, ब्रीच कँन्डी, कंबाला हिल, मुंबई-४०००२६.	लोन अकाऊंट नं. डब्लूएफएच/ सीसीएफ/ ०९१७/४२७९३१ यासंबंधित १७.०६.२०२०, एकूण अदत्त रक्कम आयएनआर १३,५१,५५,५२०.०६/-* (भारतीय रुपये तेरा कोटी एकावन्न लाख पंचावन्न हजार पाचशे वीस व पैसे सहा फक्त) आयएनआर ३,४७,६६,१४९/- (भारतीय रुपये तीन कोटी सत्तेचाळीस लाख सहासष्ट हजार एकशे एकोणपन्नास फक्त) आणि लोन अकाऊंट नं. डब्लूएफएच/ सीसीएफ/ ०९१७/४२७९४१ या संबंधित आयएनआर १०,०३,८९,३७१.०६ (भारतीय रुपये दहा कोटी तीन लाख एकोणनव्वद हजार तीनशे एकाहत्तर व पैसे सहा फक्त)	सांकेतिक ताबा ११.०६.२०२०	अनुसूचीत दिल्यानुसार	अनुसूचीत दिल्यानुसार	अनुसूचीत दिल्यानुसार	२३.०७.२०२० स. ११.०० ते सायं. ०५.००	२१.०७.२०२० स.११.०० ते सायं. ०५.००	२४.०७.२०२० स.११.०० ते सायं. ०५.०० ५ मिनिटांच्या विस्तारासह	**काही नाही/ माहीत नाही

* त्यावरील वसुली आणि/किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे पुढील व्याज, आकस्मिक खर्च, किंमत, आकार, इ.सह एकत्रित.

** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना क्र. ''डी''अंतर्गत नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेवर तेथे कोणताही भार नाही. याअधिक, सदर भार (जर असल्यास) यशस्वी बोलीदाराद्वारा सोसावयाचे आहेत/प्रदान करावयाचे आहेत. भावी खरीददार/बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील भार स्वतंत्ररीत्या निश्चित करावेत.

यावरील विनिर्दिष्ट तपशील निम्नस्वाक्षरीकारांना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार, जे तथापि उक्त तपशिलामधील कोणत्याही चुका, असत्कथन किंवा लोपन याकरिता जबाबदार असणार नाहीत. प्रस्तावकार/भावी बोलीदार/खरीददारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्वहितार्थ त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी वर नमूद करण्यात आलेल्या तथ्यासंबंधित, विशेषकरून रकाना क्र. ''डी''अंतर्गत नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेसंबंधित वरील आणि अन्य तपशिलाबाबत स्वतः खात्री करून घ्यावी.

बोली सहभाग किट www.pnbhousing.com या सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आला आहे.

ई-जाहीर लिलावाच्या शर्ती व अटी :

१. तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता / सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि/किंवा वासलात लावणे यापासून ''पीएनबीएचएफएल''च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश नाही.
२. स्थावर मालमत्तेची विक्री ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर जाहीर लिलावाद्वारा करण्यात येणार आहे.
३. खरीददारांनी विक्री विचाराधीन १०% ठेव भरणे आवश्यक आहे, जी खालील खंड (४)च्या अनुसार भरावयाच्या ठेवीच्या २५% च्या अनुसार समायोजित करण्यात येईल.
४. खरीददारांनी स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्तावास सुरक्षित धनकोद्वारा दिलेल्या विक्री निश्चितीकरणाच्या स्वीकृतीच्या पुढील कामाच्या दिवशी विक्री विचाराधीन २५% ठेव भरणे (ज्यामध्ये वरील खंड ३ अंतर्गत भरलेल्या १०% चा समावेश असेल) आवश्यक आहे.
५. स्थावर मालमत्तेची विक्री सुरक्षित धनकोंना ज्ञात असलेल्या/ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान व भावी भारांसह करण्यात येणार आहे. प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको कोणतेही त्रयस्थ दावे/हक्क/देणी याकरिता कोणत्याही परिस्थितीत जबाबदार असणार नाहीत.
६. भावी खरीददार / बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार स्वतंत्ररीत्या स्थावर मालमत्तेची पाहणी करू शकतील, परंतु ''पीएनबीएचएफएल''कडे उपलब्ध स्थावर मालमत्तेच्या नामाधिकाराबाबत मर्यादित नसलेले समाविष्ट आणि त्यांच्या निविदा/बोली अर्जप्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्वबाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. खरीददारांनी त्यांच्या समाधानार्थ स्थावर मालमत्तेसंबंधित सर्वबाबतीत यथायोग्य व्यासंगाची पूर्तता करून घेणे आवश्यक आहे.
७. सुरक्षित धनको कोणतेही कारण न दाखवता खरेदीचा कोणताही प्रस्ताव नामंजूर करण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.
८. जर एकापेक्षा अधिक प्रस्ताव असतील तर सुरक्षित धनको उच्चतर प्रस्ताव स्वीकारतील.
९. स्वारस्य असलेले पक्षकार अधिक तपशील / स्पष्टीकरणे आणि त्यांच्या अर्जाचे सादरीकरण याकरिता प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधू शकतील.
१०. खरीददाराने स्थावर मालमत्तेच्या विक्रीसंबंधित स्टँप ड्युटी, नोंदणी आकार व अन्य खर्च, कर, ड्युटीज, इ. सर्व खर्च सोसावयाचा आहे.
११. विक्री सर्फेसी कायदा व नियमांच्या तरतुदींच्या अनुसार असेल.
१२. मेसर्स श्रीराम ऑटोमॉल इंडिया लिमिटेड (एसएएमआयएल) ई-लिलावाद्वारा होणाऱ्या विक्री आयोजनामध्ये प्राधिकृत अधिकारींना साहाय्य करणार आहेत. मालमत्तेच्या पाहणीसंबंधित कोणतेही साहाय्य किंवा बोली कागदपत्रे प्राप्त करणे आणि कोणतीही अन्य शंका याकरिता किंवा नोंदणीसंबंधीत साहाय्याकरिता तुम्हास श्री. सुशांत कुमार, **संपर्क क्र.** : ०७७३८४४९६३६ किंवा श्रीमती मेघा गौर, **संपर्क क्र.** : ९५६०६२९९९८ किंवा श्री. इक्बाल आलम, **संपर्क क्र.** : +९१-९९५८१९५४५३, ''पीएनबीएचएफएल''चे अधिकृत स्वाक्षरीकर्ता यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.
१३. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पीएनबीएचएफएल), सुरक्षित धनकोची वेबसाइट म्हणजेच www.pnbhousing.com यावर तरतूद केलेली लिंक पाहावी.

अनुसूची

	स्थावर मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत (त्याखाली मालमत्तेची विक्री केली जाणार नाही)	इसारा रक्कम ठेव (इरठे)
मालमत्ता क्र. १	''व्हिलेज मजास, ता. अंधेरी, जोगेश्वरी (पू), मुंबई-४०००६० येथे स्थित त्यावरील सर्व सद्य व भावी स्ट्रक्चरसह एकत्रित, धारण केलेला सी.टी.एस. नं. १५७, १५७/१ ते ५५, प्लॉट नं. २६ (पार्ट-१), सी.टी.एस. नं. १५८, १५८/१ ते ३३, प्लॉट नं. २५ (पार्ट-१), सी.टी.एस. नं. १९२ (पार्ट), प्लॉट नं. २६ (पार्ट-१), २२१८ चौ.मी. मोजमापाच्या ''अवंत हेरिटेज फेज-१'' प्रकल्पाचे सर्व खंड व तुकडे त्यात ६ विक्री न झालेल्या युनिट्सचा समावेश आहे, जे परिशिष्ट-१ए मध्ये नमूद केलेले आहेत. तसेच १०३ विक्री झालेले युनिट्स वगळता ज्याकरिता एनओसी'ज आमच्याद्वारा निर्गमित केले आहेत व ज्याचा तपशील परिशिष्ट-१बी मध्ये नमूद केलेला आहे (पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडद्वारा निर्गमित केलेले एनओसी'ज उपलब्ध अद्ययावत रेकॉर्ड्सनुसार). परिशिष्ट-१ए व परिशिष्ट-१बी'चा तपशील www.pnbhousing.com या पीएनबीच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या विक्री सूचनेमध्ये नमूद करण्यात आला आहे.''	आयएनआर १०,७१,००,०००/- (भारतीय रुपये दहा कोटी एकाहत्तर लाख फक्त)	आयएनआर १,०७,१०,०००/- (भारतीय रुपये एक कोटी सात लाख दहा हजार फक्त)
मालमत्ता क्र. २	''व्हिलेज मजास, प्रतापनगर, जोगेश्वरी (पू), मुंबई-४०००६० येथे स्थित त्यावरील सर्व सद्य व भावी स्ट्रक्चरसह एकत्रित, धारण केलेला सी.टी.एस. नं. १५६-डी, १०५० चौ.मी. मोजमापाच्या ''अवंत हेरिटेज फेज-२'' प्रकल्पाचे सर्व खंड व तुकडे त्यात २३ विक्री न झालेल्या युनिट्सचा समावेश आहे, ज्याचा तपशील परिशिष्ट-२ए दिलेला आहे. तसेच १० विक्री झालेले युनिट्सवगळता ज्याकरिता एनओसी'ज आमच्याद्वारा निर्गमित केले आहेत व ज्याचा तपशील परिशिष्ट-२बी मध्ये नमूद केलेला आहे (पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडद्वारा निर्गमित केलेले एनओसी'ज उपलब्ध अद्ययावत रेकॉर्ड्सनुसार). परिशिष्ट-२ए व परिशिष्ट-२बी'चा तपशील www.pnbhousing.com या पीएनबीच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या विक्री सूचनेमध्ये नमूद करण्यात आला आहे.''	आयएनआर १०,६१,००,०००/- (भारतीय रुपये दहा कोटी एकसष्ट लाख फक्त)	आयएनआर १,०६,१०,०००/- (भारतीय रुपये एक कोटी सहा लाख दहा हजार फक्त)

स्थळ : मुंबई
तारीख : १९.०६.२०२०

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी
पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
(केंद्र व राज्य सरकार यांचा संयुक्त उपक्रम)
संक्रमण कार्यालय 'इ'- ब्लॉक, सिटी पार्कची उत्तर बाजू, आयकर कार्यालय 'ए' विंगच्या मागे, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१. महाराष्ट्र. संकेतस्थळ: www.mmrcl.com

No./PRO/MMRC/81

महाराष्ट्रातील कुशल/अकुशल कामगारांना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन च्या मेट्रो प्रकल्पामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध

कोविड -१९ च्या **लॉकडाउन** नंतर मुं.मे.रे.कॉ.लि. कडून राबविण्यात येणाऱ्या मुंबई मेट्रो लाईन-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) प्रकल्पामध्ये भुयारी स्थानके, NATM व बोगद्यामध्ये कुशल/अकुशल कामगारांचा तुटवडा जाणवत असुन त्याचा सदरच्या कामावर विपरीत परिणाम होत आहे.

सदरचा तुटवडा भरून काढण्याकरिता व महाराष्ट्रातील कामगारांना उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देण्याकरिता मुं.मे.रे.कॉ.लि. कडून राबविण्यात येणाऱ्या मुंबई मेट्रो लाईन-३ (भुयारी) प्रकल्पामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत व त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अनु.	कामाचा प्रकार	कामाचे स्वरुप	एकूण संख्या
१	गवंडी (mason)	भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये स्लॅब, कॉलम, काँक्रीटच्या भिंती, जिने, इ. साठी काँक्रेटीकरण करणे, भुयारी मेट्रो स्थानकाच्या बांधकामामध्ये ब्लॉक वर्क व प्लास्टरिंग/गिलावा करणे, फरशी/फ्लोअरिंग बसविणे ई.	२७७
२	सुतार काम (carpenter)	भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये कामांसाठी शटरिंग चे काम	८०४
३	फिटर (बार-बेंडिंग व फिक्सिंग करणारे)	भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये सळई (reinforcement) बांधणे (Bar bending fixing)	२०३८
४	वेल्डर	भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये वेल्डिंग चे काम करणे	१६३
५	इतर